३ वृत्तमानस मुंबई
मुंबई, गुरुवार, १२ फेब्रुवारी २०२६

गायिका "सई गोडबोले" हिच्या "तुरु तुरु" गाण्याने 10 लाख व्ह्यूजचा टप्पा पार

मुंबई : बिग बॉस फेम "आयुष संजीव" आणि अभिनेत्री "हेमल इंगळे" यांची नवी जोडी "तुरु तुरू" गाण्यासाठी एकत्र, गाण्याने दोनच दिवसात १ मिलियन व्ह्यूज पूर्ण झाले आहे.कृष्ण मुरारी, सुंदरा, दर्याचं पाणी, लई भारी दिसते पोर तसेच आता नुकतच आलेलं गायिका सई गोडबोलेच्या सुमधुर आवाजातील साईरत्न एंटरटेनमेंट प्रॉडक्शनची निर्मिती असलेलं "तुरु तुरू" गाणं नुकतंच प्रदर्शित झालं असून हे गाणं तब्बल दोन दिवसात १ मिलियन व्ह्यूज पार गेलं आहे. या गाण्याला सोशल मीडियावर लोकांची चांगलीच पसंती मिळत आहे. या गाण्यात बिग बॉस फेम अभिनेता आयुष संजीव आणि अभिनेत्री हेमल इंगळे आहेत. तसेच गायिका सई गोडबोले व गायक निहार शेंबेकर आणि शार्क यांनी हे गाणं गायलं आहे. विकास साटम हे या गाण्याचे गीतकार आहेत. तेजस नेरुरकरच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या गाण्याला प्रसिद्ध संगीतकार निहार शेंबेकर आणि शार्क यांनी संगीत दिलं आहे. पूजा काळेने या गाण्याचे नृत्य दिग्दर्शन केले आहे.

अपघात नव्हे, हा तर घातपातच...

अजित पवारांचा पायलटच नव्हे, तर विमानही बदलले !

▸ 'फ्लाईट अटेंडंट' पिंकी माळीच्या वडिलांचा दावा ▸ पायलट ट्रॅफिकमध्ये अडकल्याचा दावाही खोडला

प्रतिनिधी
■ मुंबई

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाचा पायलटच नव्हे तर विमानही ऐनवेळी बदलण्यात आले होते, असा आरोप या दुर्घटनेत ठार झालेल्या फ्लाईट अटेंडन्ट पिंकी माळी यांच्या वडिलांनी केला आहे. त्यांनी बारामतील येथील विमान दुर्घटना अपघात नव्हे तर घातपातच असल्याचा दावा केला आहे. अजित पवारांच्या मृत्यूविषयी ना-ना प्रकारचे तर्कवितर्क व्यक्त केले जात असताना पिंकी माळीच्या वडिलांनी हा आरोप केल्यामुळे राज्यात एकच खळबळ माजली आहे.

अजित पवार यांच्या विमानाचा गत २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळावर अपघात झाला होता. त्यात अजित पवार व पिंकी माळी यांच्यासह ५ जणांचा मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर पिंकी माळी यांचे वडील शिवकुमार माळी यांनी हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा संशय व्यक्त केला आहे. ते एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले, अपघाताच्या दिवशी फक्त वैमानिक नव्हे तर विमानही बदलण्यात आले होते. यापूर्वी पिंकी माळीने ४ वेळा अजित पवारांसोबत काळ्या व करड्या रंगाच्या विमानातून प्रवास केला होता. अपघाताच्या दिवशी मात्र त्यांना पांढऱ्या रंगाचे विमान देण्यात आले. असे का?.

सकाळी ६ वाजता मुंबईत कुठे ट्रॅफिक असते?

मुंबईतील वाहतूक कोंडीमुळे विमानाचा पायलट पोहोचू शकला नाही, हा दावाही शिवकुमार माळी यांनी खोडून काढला आहे. मुंबईत सकाळी ६ वा. कोणत्या भागात ट्रॅफिक असते? असा खडा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेद्वारे त्यांच्याकडील पुरावे सर्वांपुढे मांडले. त्यांच्या सारखेच आम्हाला हा अपघात नव्हे तर घातपात असल्याचा संशय आहे, असेही ते यावेळी म्हणाले. शिवकुमार माळी यांच्या या आरोपामुळे अजित पवारांचे विमान खरेच ऐनवेळी बदलण्यात आले होते का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

विमान कंपनीने आमच्याशी संपर्क साधला नाही

पिंकीने आदल्या दिवशी मला फोन करून आपण अजित पवारांसोबत प्रवास करणार असल्याचे सांगितले होते. बारामतीला पोहोचल्यानंतर हॉटेलमध्ये गेल्यानंतर तुमच्याशी बोलेन असे ती म्हणाली होती. तुला काही बोलायचे आहे का? असे विचारले असता तिने आपल्याला खूप काही बोलायचे आहे असे सांगितले. पण दुर्दैवाने लँडिंगवेळी अपघात झाला. दुर्दैव म्हणजे, पिंकीच्या विमानाचा अपघात झाल्यानंतर विमान कंपनीने आमच्याशी कोणताही संपर्क साधला नाही. माझे जावई व नंतर मी स्वतः तिचा मृतदेह आणण्यासाठी बारामतीला गेलो. आम्ही गेलो नसतो तर तिचा मृतदेहही आमच्या हाती लागला नसता. त्यानंतरही कंपनीने आमच्याशी कोणताही संपर्क साधला नाही. तिचे वेतन, भत्ते व विम्याबाबत आम्हाला काहीही सांगण्यात आले नाही, असेही शिवकुमार माळी यावेळी म्हणाले.

कोस्टल रोडवर देशातील पहिला 'मेलडी रोड'

'जय हो'च्या धुनमधून देशभक्तीची भावना जागृत होणार !

उपमुख्यमंत्री शिंदे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
■ मुंबई

भारतातील हा पहिलाच संगीतमय रस्ता असून अत्यंत अभिनव अशा या संकल्पनेमुळे मुंबईकरांच्या मनात देशभक्तीची भावना जागृत होईल. सध्या सुमारे ५०० मीटर अंतरावर तयार करण्यात आलेला हा प्रकल्प पुढे वाढवण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

मुंबई महानगरपालिकेच्या वतीने कोस्टल रोड अर्थात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज मार्गावर देशातील पहिल्या 'मेलडी रोड'चा शुभारंभ करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल ११ फेब्रुवारी २०२६ रोजी या उपक्रमाचे उद्घाटन झाले. उद्घाटनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार राहुल शेवाळे यांनी प्रत्यक्ष प्रवास करून संगीतमय रस्त्याचा अनुभव घेतला. वाहन चालवत असताना 'स्लमडॉग मिलेनियर' चित्रपटातील प्रसिद्ध 'जय हो' या गाण्याची धून ऐकू आली, हा वेगळाच आणि आनंददायी अनुभव असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

या प्रकल्पासाठी हंगेरीच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला असून उपस्थित हंगेरीचे काउन्सिल जनरल यांचे त्यांनी अभिनंदन केले. या उपक्रमाची संकल्पना मांडल्याबद्दल खासदार राहुल शेवाळे यांचेही त्यांनी विशेष आभार मानले. मुंबईत आणि कदाचित देशात पहिल्यांदाच असा मेलोडी रोड साकारला गेला असून या उपक्रमामुळे शहराच्या नावात आणखी एक नाविन्यपूर्ण भर पडली आहे. भविष्यातही अशा अभिनव सुविधा नागरिकांना देण्याचा प्रयत्न सुरू राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त करत सर्व संबंधितांचे अभिनंदन करून या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

आमदार प्रकाश सुर्वे यांच्याहस्ते कांदिवली, पूर्व सिंग इस्टेटच्या

120 बाधित झोपडपट्टीवासियांना सदनिकांचे वाटप

प्रतिनिधी
■ मुंबई

मागाठाणे विधानसभा क्षेत्राचे शिवसेनेचे आमदार तथा उत्तर मुंबई लोकसभाप्रमुख प्रकाशदादा सुर्वे यांच्या हस्ते आज मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील कांदिवली (पूर्व) येथील सिंग इस्टेट परिसरातील १२० बाधित झोपडपट्टी रहिवाश्यांना सदनिकांचे वाटप करण्यात आले. कांदिवली (पूर्व) येथून जाणाऱ्या विशेष पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत महानगरपालिकेने घोषित केलेल्या विकास नियोजित रस्त्यामुळे बाधित झालेल्या रहिवाश्यांना स्वतः चे हक्काचे घर मिळावे यासाठी आमदार प्रकाश सुर्वे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सातत्याने बैठका घेऊन पाठपुरावा केला होता.

या प्रकल्पाअंतर्गत मे. दर्शन डेव्हलोपर्स यांनी विकसित केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या कांदिवली(पूर्व),इमारत क्रमांक ए-०१, पॅटर्न टॉवर, भु.क्र. १६३/ए-२ (भाग), आकुर्ली गाव, तसेच सुहास मोदी झोपडपट्टी पुनर्वसन सहकारी संस्था, इमारत क्रमांक ०३, वाढवाण गाव, कांदिवली (पूर्व) येथील निवासी सदनिकांचे वाटप आमदार सुर्वे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षण विभागाचे सहायक अभियंता हेमंत पंत, दुय्यम अभियंता स्वप्नील गुंड, शिवसेनेचे पदाधिकारी तसेच स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. घरांचे वाटप झाल्याबद्दल १२० झोपडपट्टीवासियांनी आमदार प्रकाश सुर्वे यांचे आभार मानले.

देशातील पहिला 'मुंबई क्लायमेट वीक' 17 ते 19 फेब्रुवारी दरम्यान मुंबईत

जगभरातील विविध क्षेत्रातील मान्यवर राहणार उपस्थित

प्रतिनिधी
■ मुंबई

हवामान बदलाच्या उपाययोजनांच्या पार्श्वभूमीवर भारतातील पहिला मुंबई क्लायमेट वीक (एमसीडब्ल्यू) १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मुंबईत आयोजित करण्यात आला आहे. या माध्यमातून ग्लोबल साऊथ देशांसाठी हवामान नेतृत्वाचा नवा मंच उभारला जाणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या क्लायमेट वीकच्या माध्यमातून जागतिक स्तरावरील शासन नेते , उद्योग क्षेत्रातील प्रमुख, हवामान तज्ज्ञ, विविध संस्था, युवक आणि विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी एकत्र येणार आहेत.

हा उपक्रम 'प्रोजेक्ट मुंबई' या स्वयंसेवी संस्थेने आयोजित केला असून, महाराष्ट्र शासन, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, 'एमएमआरडीए' आणि मुंबई महापालिका सहकार्य करणार आहे. जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे या क्लायमेट वीकचे मुख्य केंद्र (हब) उभारण्यात येणार असून, शहरभर महाविद्यालये, समुदाय व सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रमांची 'हब-अँड-स्पोक' पद्धतीने आखणी करण्यात आली आहे. हवामानाशी निगडित प्रत्यक्ष उपाययोजना प्रदर्शित व विस्तार करण्यावर भर दिला जाणार आहे, अशी माहिती या उपक्रमाचे आयोजक प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी यांनी दिली.

या उपक्रमाविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "मुंबई क्लायमेट वीक भारताची हवामान विषयक कृतीशील भूमिका अधोरेखित करतो. शासन, उद्योग, वित्त, तज्ज्ञ आणि युवक यांना एकत्र आणून महाराष्ट्र स्वच्छ, सुरक्षित व शाश्वत भविष्य घडवण्यासाठी सज्ज असल्याचा स्पष्ट संदेश याद्वारे जाईल."

प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी म्हणाले, "मुंबईची जिद्द आणि कल्पकता हवामान संकटांसमोर ठामपणे उभी राहील. नागरिकांच्या सहभागातून उभा राहणारा हा भारतातील पहिला व्यापक हवामान चळवळीचा प्रयोग ठरणार आहे."

जागतिक स्तरावरील हिलरी क्लिंटन, बिल गेट्स, राजीव शाह (रॉकफेलर फाउंडेशन), आयएफसीचे इमाद फखुरी, क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, यांसारखे आंतरराष्ट्रीय मान्यवर या उपक्रमात सहभागी होणार आहेत. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी, उद्योग मंत्री पियूष गोयल यांसह विविध राज्यांचे नेते, उद्योग व वित्त क्षेत्रातून जमशेद गोदरेज, नादिर गोदरेज, अमित चंद्रा, व्ही. वैद्यनाथन, स्वयंसेवी संस्था व संशोधन क्षेत्रातून रोहिणी निलेकणी, सौम्या स्वामीनाथन, मृदुला रमेश आणि पर्यावरण विषयावर काम करणाऱ्या अभिनेत्री दिया मिर्झा आणि भूमी पेडणेकर या उपक्रमात होणार आहेत.

केंद्र सरकारच्या कामगार कायद्याविरोधातील आजच्या 'भारत बंद'ला काँग्रेसचा पाठिंबा

प्रतिनिधी
■ मुंबई

केंद्रातील भाजपा सरकारने कामगार कायद्यात केलेल्या बदलाला देशभरातून तीव्र विरोध केला जात आहे. या कामगार कायद्यांविरोधात देशभरातील दहा कामगार संघटनांनी उद्या गुरुवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी भारत बंदची हाक दिली आहे. शेतकऱ्यांच्या विविध संघटनांनीही या भारत बंदला पाठिंबा दिला असून अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनेही उद्याच्या भारत बंदला पाठिंबा दिलेला आहे.

केंद्र सरकारने कामगार कायद्यात केलेल्या बदलांमुळे कामगारांच्या समोर विविध प्रश्न व समस्या निर्माण झाल्या आहेत. कामगार कायद्यातील बदलामुळे कामगारांच्या हिताला बाधा पोहचलेली आहे, या नव्या बदलामुळे कामगारांच्या हाताला कमी संधी मिळणार आहे. केंद्रातील भाजपा सरकारचे धोरण हे शेतकरी व कामगार विरोधी असल्याने या बंदमध्ये काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सहभागी व्हावे, अशा सुचना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून देण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲंड गणेश पाटील यांनी दिली आहे.

आजच्या संपाला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा जाहीर पाठिंबा

राष्ट्रीय स्तरावर प्रमुख कामगार संघटना व शेतकरी संघटनांनी आज १२ फेब्रुवारी २०२६ रोजी अखिल भारतीय औद्योगिक संप व ग्रामीण भारत बंद करण्याची हाक दिली आहे. या संपाला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने जाहीर पाठिंबा दिला आहे.कामगार चळवळीने आणि कामगारांनी लढून मिळवलेले त्यांचे हक्क व २९ कामगार कायदे उध्वस्त करत केंद्र सरकारने चार श्रम संहिता लागू केल्या आहेत. अमेरिकेबरोबर अत्यंत लाचार व्यापार करार करून देशाची स्वायत्तता वेशीवर टांगत भारतीय शेती, शेतकरी, उद्योग व कामगार यांना उध्वस्त करणारा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रभरातील सर्व कामगार, कर्मचारी, शेतकरी व शेतमजुरांनी या औद्योगिक संप व ग्रामीण भारत बंदमध्ये पूर्ण ताकदीने सहभागी व्हावे असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे. केंद्र व राज्य सरकारने या आंदोलनाची दखल घेत आपले जनविरोधी धोरण सोडावे, भारत-अमेरिका व्यापार करार तातडीने थांबवावा, चार श्रम संहिता रद्द कराव्यात, वीज दुरुस्ती बिल मागे घ्यावे, बियाणे बिल लादणे बंद करावे, पूर्वीचा रोजगार हमीचा कायदा पुन्हा लागू करून त्यामध्ये अधिक मजूर हिताचे प्रावधान करावे, योजना कर्मचाऱ्यांना नियमित सरकारी कर्मचारी म्हणून दर्जा देत त्यांचे प्रश्न सोडवावेत असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी केले आहे.

मुंबईतील उद्योजकाने साकारली जगातील सर्वात महागडी साडी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील प्रसिद्ध उद्योजक रोहित पिसाळ यांनी माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ३९ कोटी रुपयांची हिरेजडित सोन्याची साडी अर्पण करून अनोखी श्रद्धांजली वाहिली आहे. साडीवर ३६ कोटींचे हिरे आणि २ किलो सोन्याचा मुलामा नक्षीकामाने मढविण्यात आला आहे. कलेचा उपयोग जेव्हा महान व्यक्तींच्या स्मृती जपण्यासाठी केला जातो, तेव्हा एक नवा इतिहास घडतो.

मुंबईचे प्रसिद्ध उद्योजक आणि ज्वेलरी डिझायनर रोहित पिसाळ यांनी अशाच एका अनोख्या प्रयोगातून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी, त्यागमूर्ती माता रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त (७ फेब्रुवारी) रोहित पिसाळ यांनी त्यांना ३९ कोटी रुपयांची हिरेजडित सोन्याची साडी समर्पित केली आहे.ही साडी म्हणजे आधुनिक तंत्रज्ञान आणि पारंपारिक कारागिरीचा एक दुर्मिळ संगम आहे. रोहित पिसाळ यांनी ही कलाकृती साकारण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली आहे.

या साडीच्या निर्मितीमध्ये तब्बल २ किलो शुद्ध सोन्याचा वापर करण्यात आला आहे. यात सोन्याच्या नाजूक नक्षीकामासोबतच साडीवर अत्यंत दुर्मिळ आणि महागडे हिरे जडवण्यात आले आहेत. ज्यामुळे तिची एकूण किंमत ३९ कोटी रुपये झाली आहे.

PUBLIC NOTICE

Cipla Limited

Cipla House, Peninsula Business Park, Ganpatrao Kadam Marg, Mumbai, Maharashtra - 400013

Notice is hereby given that the certificates for the undermentioned securities of the Company has been lost and the holder of the said securities / applicant has applied to the Company to issue duplicate certificates.

Any person who has a claim in respect of the said securities should lodge such claim with the Company at its Registered Office within **15 days** from this date, else the Company will proceed to issue duplicate certificates without further intimation.

Name Of Holders	Kind and FV of Securities	No. of Securities	Folio No.	Certificate No.	Distinctive No. From	Distinctive No. To
Mr. Jayprakash B. Jhaveri (Shareholder) P.J. Jhaveri (Jointholder)	Equity & FV 10	50	CIP0014133	144741	8259251	8259300
	Equity & FV 10	50	CIP0014133	144742	8259301	8259350
	Equity & FV 10	10	CIP0014133	263342	19987690	19987699
	Equity & FV 10	220	CIP0014133	303143	33851196	33851415

महाराष्ट्र शासन

इलाखा शहर विभाग, (सा.बां.)

ई-निविदा सुचना क्र. ७६ सन २०२५-२०२६

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक २२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीदारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	अंदाजित रक्कम रू. लक्ष
१	चर्चगेट मुंबई येथील बॅरेक नं. ४ येथे दुरूस्ती व नुतनीकरण करणे.	४३.९५
२	पोलीस मुख्यालय इमारत मुंबई येथील वार्षिक देखभाल व दुरूस्तीची कामे करणे.	५१.४१
३	चर्चगेट मुंबई येथील सी रोड मुलांचे वसतीगृह येथे वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे करणे.	२५.२०
४	शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई येथील स्टेट सेंट्रल लायब्ररी येथे मुख्य हॉल व राजा राममोहन रॉय ऑफिस वॉल येथे विविध विभाग, डायरेक्टर कॅबीन येथे किरकोळ कामे करणे.	८९.८५
५	मलबार हिल मुंबई येथील सह्याद्री गेस्ट हाऊस ऑडीटेरीयम समिती हॉल, पॅसेल येथे दुरूस्ती व रंगकाम करणे.	१६.६०
६	एल टी मार्ग मुंबई येथील सी पी ऑफिस आवार तळमजला ते २ मजला कॉन्स्टेबल क्वाटर्सबी ब्लॉक येथे दुरुस्तीची कामे करणे.	६३.६३
७	विधानभवन मुंबई येथील तळमजल्यावरील स्पिकर चेंबर ०२० येथे नुतनीकरण करणे.	३८.८९
८	यलोगेट पोलीस स्टेशन मुंबई येथील २ व ३ मजल्यावरील टॉयलेट ब्लॉक व युटीलिटी एरीया येथे प्लास्टर व रंगकाम करणे.	१२.६०
९	बाजार गेट पोलीस स्टेशन मुंबई येथील मुख्य इमारत येथे दुरुस्ती व वार्षिक देखभालीची कामे करणे.	१४.०३
१०	विधानभवन मुंबई येथील तळमजल्यावरील स्पिकर चेंबर ०१८ व ०१९ येथे नुतनीकरण करणे.	५८.६९
११	नविन विधानभवन मुंबई येथील डाटा सेंटर पॉलिकार्बोनेट शीट रूफ दुरूस्ती व नुतनीकरण करणे.	८०.५३
१२	मादाम कामा रोड मुंबई येथील नविन प्रशासकिय इमारत ८ ते ११ मजल्यावरील फॉल्स सिलिंग, वुडन पार्टीशन, रंगकाम, दुरुस्ती करणे.	१०.४६
१३	नविन विधानभवन मुंबई येथील १ मजल्यावरील महिला व पुरूष प्रसाधनगृह नुतनीकरण करणे.	८४.०५

ई-निविदा उपलब्ध कालावधी दि. १२.२.२०२६ ते दि. २०.२.२०२६ पर्यंत.
ई-निविदा उघडणे - दि. २३.२.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल /सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यातयेणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com 2) http ://mahatenders.gov.in
जा.क्रं. इशवि/निलि / ९२८
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१.
Email: presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : ६/२/२०२६
आरओसी-२०२५-२६/क्र-५/C५७१४
दिनांक : ११/०२/२०२६

स्वाक्षरी/-
(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडा घटक)

म्हाडा MHADA

ई- निविदा सुचना

ई- निविदा क्र. का.अ./फ-द/म.इ.दु.व पु.मं./४१/२०२६

Main Portal : https://mahatenders.gov.in MHADA Portal : https://mhada.gov.in

कार्यकारी अभियंता फ (दक्षिण) विभाग, मुंबई ईमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, म्हाडाचा विभगीय घटक, बी.एम.सी.फ - दक्षिण, कार्यालय अनेक्स इमारत, ३रा मजला, परेल, मुंबई-४०००१२. यांचेकडे मुंबई शहर जिल्हा अंतर्गत Deputy District Registrar यांचेकडे उचित वर्गात नोदणीकृत असलेल्या पात्र मजूर सहकारी संस्थाकडून एकूण ०४ कामाकरीता बी- १ (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे [ऑनलाईन। निविदा मागवित आहोत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	टप्पा	कालावधी	अ.क्र.	टप्पा	कालावधी
१	निविदा विक्री सुरु	१३/०२/२०२६ सकाळी १०.१०	२	निविदा विक्री बंद	२०/०२/२०२६ सायंकाळी ४:००
३	तांत्रिक बोली उघडणे	२३/०२/२०२६ सकाळी ११:००	४	आर्थिक बोली उघडणे	२४/०२/२०२६ सकाळी ११:००

कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. सशर्त ऑफर्स स्विकारल्या जाणार नाहीत.
टिप - १. कृपया वेबसाईटवर निविदा सूचना पहा.
२. शुध्दीपत्रक / दुरुस्ती जर काही असेल तर ती फक्त वेबसाईटवर प्रकाशित करण्यात येईल.

CPRO/A/79 Follow us : mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता / फ [दक्षिण विभाग,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड

सीआयएन: एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८
२८/३०, अनंत वाडी, बिनानी भवन, तळ मजला, भूलेश्वर, मुंबई ४००००२ ई-मेल : spvglobaltrading@gmail.com संकेतस्थळ: www. spvglobal.in

३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा

(रु. लाखामध्ये)

अनु. क्र.	तपशिल	एकमेव					एकत्रिकृत				
		संपलेले त्रैमासिक	संपलेले त्रैमासिक गत वर्ष	संपलेले ९ महिने	संपलेले ९ महिने गत वर्ष	संपलेले गत वर्ष	संपलेले त्रैमासिक	संपलेले त्रैमासिक गत वर्ष	संपलेले ९ महिने	संपलेले ९ महिने गत वर्ष	संपलेले गत वर्ष
		३१ डिसे २५	३१ डिसे २४	३१ डिसे २५	३१ डिसे २४	३१ मार्च २५	३१ डिसे २५	३१ डिसे २४	३१ डिसे २५	३१ डिसे २४	३१ मार्च २५
१	कार्यामधून एकूण उत्पन्न (निव्वळ)	१.०५	७२.३०	३.४६	२,३९३.२७	२,४०५.५०	२३,७१०.९१	२३,२३५.८४	७५,७३९.०२	७०,०७५.८२	९१,१९२.३२
२	सामान्य कार्यामधून कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व)	(३.१०)	(११.५७)	(४३.८३)	२.०४	(२.९३)	३,३५६.०९	१,१६१.६५	५,२६४.६७	२,४७९.८८	३,८२४.१३
३	कर पूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व)	(३.१०)	(११.५७)	(४३.८३)	२.०४	(२.९३)	३,३५६.०९	१,१६१.६५	५,२६४.६७	२,४७९.८८	३,८२४.१३
४	कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व)	(२.३२)	(८.६६)	(३२.७५)	१.५२	(२.१९)	२,५२४.७०	५५४.०९	२,९४५.८६	१,४०१.०६	२,६५३.८३
५	कालावधीसाठी एकूण सर्वकष उत्पन्न (एकत्रित नफा/ (तोटा))	(२.२७)	(८.७८)	(३२.६१)	१.४२	(२.३४)	२,५२४.७६	५५३.९७	३,९४६.००	१,४००.९६	२,६११.१५
६	सम भाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रती समभाग)	११६.००	११६.००	११६.००	११६.००	११६.००	११६.००	११६.००	११६.००	११६.००	११६.००
७	राखीव (गत वर्षाच्या लेखापरीक्षित शिलकीच्या ताळेबंदामध्ये नमूद केल्यानुसार (पुनर्मुल्यांकित राखीव वगळता)						--	--	--	--	१६,४३६.१४
८	प्रती समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबी नंतर) (ए) मूळ आणि सौम्यीकृत	(०.१२)*	(०.४४)*	(१.६७)*	०.०८*	(०.११)	७०.६६*	१५.३२*	१०९.७७*	३९.२८*	७४.२८

१. वरील अलिखित आर्थिक परिणामांचे पुनरावलोकन ऑडिट समितीने केले आहे आणि शिफारस केली आहे आणि १० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या बैठकीत मंडळाने मंजूर केले आहे. वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील निकालांचे मर्यादित पुनरावलोकन केले आहे. एक अपात्र मत जारी केले आहे. त्यावर त्यांच्याद्वारे ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या नऊ महिन्यांसाठी आर्थिक निकालाचे संपूर्ण स्वरूप www.bseindia.com आणि www.spvglobal.in वर उपलब्ध आहे.

ठिकाण: मुंबई
दिनांकित: १० फेब्रुवारी २०२६

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड करीता
सही/-
बालकृष्ण बिनानी
व्यवस्थापकीय संचालक डीआयएन: ००१७५०८०